# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे..

सन २०२१ च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०२/११/२०२० ते दिनांक २५/०१/२०२१ पर्यंत मुदतवाढीने निश्चित करण्यात आला होता. याबाबत आपणास कळविण्यात येते की, खाजगीरित्या इयत्ता १०वी व इयत्ता १२ वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज नियमित, विलंब व अतिविलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

२. **इ.१०वी व इ.१२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या** नियमित, विलंब व अतिविलंब शुल्काच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

### नियमित शुल्क

| अ.क्र. | नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | शनिवार दिनांक ३०/०१/२०२१ ते मंगळवार दिनांक ०२/०२/२०२१ | विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे. |
| २ | सोमवार दिनांक ०१/०२/२०२१ ते मंगळवार दिनांक ०२/०२/२०२१ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | बुधवार दिनांक ०३/०२/२०२१ | संपर्क केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

## विलंब व अति विलंब शुल्कासह

| अ.क्र | विलंब शुल्क प्रती विद्यार्थी रू.१००/— स्विकारून माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इ.१०वी) | विलंब शुल्क प्रती विद्यार्थी रू. २५/— स्विकारून कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इ.१२वी) | माध्यमिक शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी अति विलंब शुल्क प्रती विद्यार्थी रु.२०/— प्रतीदिन स्विकारुन विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इ.१० वी व इ.१२वी ) |
|---|---|---|---|
| | बुधवार दि.०३/०२/२०२१ ते बुधवार दि.१०/०२/२०२१ | बुधवार दि.०३/०२/२०२१ ते बुधवार दि.१०/०२/२०२१ | गुरुवार दि.११/०२/२०२१ ते बुधवार दि.१७/०२/२०२१ |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ–** इ.१० वी – **http://form17.mh-ssc.ac.in**
इ.१२ वी – **http://form17.mh-hsc.ac.in**

४. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. **विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (compulsory) आहे.**

६. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज, विहित शुल्काची पावती व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे–
**इ.१०वी –रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)**
**इ.१२वी– रू. ५००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)**

९. अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज करावयाचे आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्याचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे.

१०. इ.१०वी, इ.१२वी सन २०२१ – खाजगी विदयार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (**Debit Card/Credit Card/UPI/Net Banking**) व्दारे भरणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती संपर्क केंद्राला देण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची (उदा. माध्यम, शाखा, संपर्क केंद्र अथवा अन्य कारणास्तव असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नाव नोंदणी शुल्क जमा करावे लागेल याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/कनिष्ठ महाविद्यालय/संपर्क केंद्र यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१२. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्र.०२०-२५७०५२०७/२५७०५२०८ वर व तसेच इतर बाबींसाठी २५७०५२७१ वर संपर्क साधावा.

१३. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संपर्क केंद्र/कनिष्ठ महाविद्यालयांकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१४. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

B Mahajan
(पोपटराव महाजन)
सहा.सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

प्रति,
प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
व खाजगी विद्यार्थी संपर्क केंद्रे -
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

इ.10 वी / 12 वी सन-2021 परीक्षेसाठीच्या खाजगी विद्यार्थी (ऑनलाईन नाव-नोंदणीसाठी नियमीत, विलंब व अतिविलंब शुल्कासह अर्ज भरणेबाबत वरील प्रकटनाची नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(श्री. देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर